**ठळक बातम्या**

- देशात सध्या अभूतपूर्व परिवर्तन होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नेदरलँडमधल्या भारतीय वंशाच्या नागरिकांसमोर प्रतिपादन

- नीट पेपरफुटीप्रकरणी पुण्यातून एका प्राध्यापिकेला अटक

- २० दिवसात हज यात्रा पूर्ण करण्यासाठीच्या लघू पॅकेजची केंद्र सरकारकडून घोषणा

- गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त, ८ नक्षलवाद्यांना अटक, ५ जणांचं आत्मसमर्पण

**आणि**

- अंदमानमध्ये नैऋत्य मौसमी पाऊस दाखल, राज्यात १० जूनपर्यंत येण्याचा अंदाज

**<><><><><>**

भारत सध्या अभूतपूर्व परिवर्तन अनुभवत असून देशाच्या महत्वाकांक्षा आता सीमांपुरत्या सिमित राहिल्या नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आपल्या नेदरलँड्स दौऱ्यात हेग इथं भारतीय समुदायाला संबोधित करताना बोलत होते.

- **- होल्ड प्रधानमंत्री बाइट - -**

भारताच्या स्टार्ट अप परिसंस्थेची प्रशंसा करताना जगातलं तिसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं स्टार्ट अप जाळं भारताचं असल्याचं त्यांनी सांगितलं. भारत आज ऑलिम्पिकचं यजमानपद भूषवण्याची तयारी ठेवतो तसंच जागतिक उत्पादक हब, हरित ऊर्जा नेतृत्व तसंच जगाचं विकास इंजिन म्हणून पुढे येण्याची महत्वाकांक्षाही भारत बाळगून आहे असं ते म्हणाले. ए आय, संरक्षण आणि अंतराळ क्षेत्रात भारत उल्लेखनीय कामगिरी करत असून संशोधन आणि सर्जनशीलतेची संस्कृती आणखी विस्तारत असल्याचं त्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांनी आज नेदरलँड्सचे राजे विल्यम अलेक्झांडर आणि राणी मॅक्सिमा यांचीही भेट घेतली. नेदरलँड्सचे प्रधानमंत्री रॉब जेट्टेन यांची ते थोड्याच वेळात भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयनं आज पुण्यातून मनिषा मांढरे या प्राध्यापिकेला अटक केली. मॉडर्न कॉलेजमध्ये शिकवणाऱ्या मांढरे या नीट पेपर तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होत्या. तसंच एनटीएकडून त्यांची तज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नीटचा जीवशास्त्राचा पेपर फोडण्यात मांढरे या प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयने सांगितलं आहे. नीट पेपर फुटीप्रकरणी सीबीआयनं आतापर्यंत ९ आरोपींना अटक केली आहे. याप्रकरणी अटक झालेल्या प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे या दोघांना न्यायालयानं १० दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवलं आहे.

**<><><><><>**

एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेत केंद्र सरकारनं आज दोन सह सचिव आणि दोन सहसंचालकांची नियुक्ती केली आहे. भारतीय सांख्यिकी सेवेच्या १९९८ तुकडीच्या अधिकारी अनुजा बापट आणि भारतीय महसूल सेवेच्या २००४ तुकडीच्या अधिकारी रुचिता वीज या पुढील पाच वर्षांसाठी एन टी ए च्या सह सचिव असतील. तर,  भारतीय महसूल सेवेच्या प्राप्तिकर विभागाचे अधिकारी आकाश जैन तसंच भारतीय लेखा परीक्षण आणि लेखा विभागातील अधिकारी राजेंद्र भोजगढीया  यांची सह संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

शिक्षण मंत्रालयाने देशातील १४ ते १८ वयोगटातील, शाळेबाहेर असलेल्या मुलांच्या वाढत्या संख्येबाबत  चिंता व्यक्त केली आहे. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. उपलब्ध आकडेवारीनुसार, देशात इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक १०० मुलांपैकी केवळ ६२ मुलेच  बारावीपर्यंत पोहोचतात. त्यामुळे सध्या १४ ते १८ वयोगटातील दोन कोटींहून अधिक मुले शाळेबाहेर आहेत.  यावेळी 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग'  द्वारे प्रस्तावित करण्यात आलेल्या एका नवीन उपक्रमाच्या अंमलबजावणी धोरणाचाही या बैठकीत आढावा घेण्यात आला.

**<><><><><>**

सी बी एस ई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या  १ जुलैपासून नववीच्या अभ्यासक्रमात तीन भाषा अनिवार्य केल्या आहेत . या तीन भाषांपैकी किमान दोन भाषा या

मूळ भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. तसंच दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तिसऱ्या भाषेची कोणतीही 'बोर्ड परीक्षा' घेतली जाणार नाही, सर्व मूल्यमापन पूर्णपणे शाळा-आधारित आणि अंतर्गत स्वरूपाचे असेल, असं मंडळाने सांगितले आहे.

<><><><>

केंद्र सरकारने भारतीय हज यात्रेकरूंसाठी आज 'लघु हज पॅकेज'ची घोषणा केली. या नवीन व्यवस्थेअंतर्गत, यात्रेकरूंना हजचे विधी पूर्ण करून सुमारे २० दिवसांच्या आत परतणे शक्य होईल; हे 'लघु हज पॅकेज' १७ मे ते ५ जून या कालावधीत राबवले जाईल. या विशेष उपक्रमांतर्गत सुमारे १० हजार यात्रेकरू यावर्षी हज यात्रेला जाणार आहेत.

<><><><>

गडचिरोली जिल्हा नक्षलवादी मुक्त झाल्याची घोषणा आज पोलिसांनी केली. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' दरम्यान ८ नक्षल्यांना अटक करण्यात आली असून, ५ नक्षल्यांनी आज पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. मात्र, विचारधारा संपली असं म्हणू शकत नाही. त्यामुळे यापुढेही इतर राज्यातून गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी येऊ नये, यासाठी पोलिस सातत्यानं लक्ष ठेवून राहतील, असं पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

अहोरात्र कार्य करणाऱ्या रुग्णालयांप्रमाणे दिवसरात्र काम करण्याची गरज आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केलं आहे. मध्यप्रदेश उच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते आज बोलत होते. न्यायव्यवस्थेच्या कामकाजात होणारा वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी तंत्रज्ञान हाच एकमेव प्रभावी उपाय असल्याचं ते म्हणाले. न्याय वितरणाला गती देण्यासाठी तांत्रिक प्रगतीचा वापर करून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अशी अधिक सखोल न्यायिक रचना करण्याचं आवाहन सरन्यायाधीशांनी यावेळी बोलताना केलं.

<><><><>

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने एका मोठ्या ड्रग रॅकेटचा पर्दाफाश करत १८२ कोटी रुपये किंमतीचे २२७ किलो वजनाचे कॅप्टागॉन हे अमली पदार्थ जप्त केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं आहे. मध्य आशियातल्या दहशतवादी गटांकडून कॅप्टागॉन या अमली पदार्थाची तस्करी केली जाते. याप्रकरणी दिल्लीतून एका सीरीयाच्या नागरिकाला अटक झाली आहे.

<><><><><>

केरळचे होऊ घातलेले मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांनी आज काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल यांची त्यांच्या तिरुवनंतपुरम इथल्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमधे पाऊण तास चर्चा झाली. त्यानंतर दोघांनी वार्ताहरांशी संवाद साधला. वेगेवेगळी मतं असणं हे राजकारणात नैसर्गिक आहे. मात्र पक्षाने एकदा निर्णय घेतला की त्या निर्णयामागे ठामपणे उभं राहणं हे आमचं कर्तव्य आहे असं वेणुगोपाल यावेळी म्हणाले. तर दोघांमधे मतभेद असल्याचं वृत्त फेटाळून लावत मंत्रिमंडळ स्थापनेची चर्चा सुरळीतपणे सुरू असल्याचं सतीशन यांनी सांगितलं. मंत्र्यांची यादी उद्या दुपारपर्यंत राज्यपालांना दिली जाईल असं ते म्हणाले.

वेणुगोपाल यांची भेट घेण्याआधी सतीशन यांनी ज्येष्ठ नेते रमेश चेन्निथला यांचीही भेट घेतली. चेन्निथला यांनी मंत्रिमंडळात सहभागी व्हावं यासाठी सतीशन प्रयत्नरत असल्याचं सांगितलं जात आहे. केरळच्या मुख्यमंत्रीपदासाठी चेन्निथला हेही आग्रही होते.

<><><><><>

भारतीय पेट्रोलियम कंपन्यांकडून भूतानला भारतापेक्षा खूपच कमी दरात पेट्रोल विकले जात असल्याच्या दाव्याचं सरकारनं खंडन केलं आहे. समाज माध्यमावरचा हा व्हिडिओ जुना असून नागरिकांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने तो संदर्भाशिवाय शेअर केला जात आहे, असं प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या फॅक्ट चेक युनिटने म्हटलं आहे.

<><><><><>

थायलंड मधल्या बँकॉक इथं आज रेल्वे आणि सार्वजनिक बसची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून एकूण २५ जण गंभीर जखमी झाले आहेत. रेल्वे आणि बसची टक्कर होऊन आगीचा भडका उडाला यामध्ये अनेक चारचाकी आणि दुचाकींना झळ पोहोचली आहे.

<><><><><>

इस्रायलने गाझापट्टीवर केलेल्या हल्ल्यात हमासच्या लष्करी विभागाचा नेता मारला गेल्याचा दावा इस्रायलने केला आहे. इझ अल दीन अल हद्दाद असं त्याचं नाव असून ७ ऑक्टोबर २०२३ ला इस्रायलवर हल्ला करण्यात त्याचा महत्त्वाचा वाटा असल्याचं इस्रायलच्या लष्करानं म्हटलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये कोलकात्यात कोलकाता नाईट रायडर्सचा सामना गुजरात टायटन्ससोबत सुरू आहे. या सामन्यात गुजरातनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा कोलकात्याच्या ८ षटकात १ बाद ८५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

अमेरिका आणि नायजेरियाच्या सशस्त्र दलांनी इस्लामिक स्टेट ग्रुपचा म्होरक्या अबू बिलाल अल मैनुकी याला काल एका संयुक्त मोहिमेत ठार केल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं आहे.

<><><><><>

नैऋत्य मौसमी पाऊस आज भारताच्या भूमीत दाखल झाल्याचं हवामान विभागानं जाहीर केल. अंदमान आणि निकोबार बेटांवर आज या पावसानं हजेरी लावली. श्री विजय पुरमसह अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे. यावर्षी मान्सून एक जूनपर्यंत तामिळनाडूत तर १० जूनपर्यंत राज्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//